

मुंबई : मेट्रो स्थानकातील सरकत्या जिन्याचे उद्‌घाटन करताना अधिकारी.

# मेट्रो-३ प्रकल्पात पहिला सरकता जिना

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्गाचे काम वेगात सुरू आहे. प्रवासीभिमुख सुविधा देण्याच्या कामांना गती आली आहे. यात आता मेट्रो-३ च्या सिद्धिविनायक मेट्रो स्थानकात पहिल्या सरकत्या जिन्याची उभारणी करण्यात आली. या सरकत्या जिन्यामध्ये प्रति एका तासात ७ हजार ३०० प्रवासी वाहून नेण्याची क्षमता आहे. यासाठी साधारण ०.६५ मीटर प्रति सेकंद वेग ठेवला जाईल. तर, कमीत कमी ०.५ मीटर प्रति सेकंद वेग ठेवल्यास प्रति तास ६ हजार प्रवासी वाहून नेण्याची क्षमता या सरकत्या जिन्यात आहे. दरम्यान, हा सरकता जिना १८ दिवसांच्या विक्रमी वेळेत सुरू केला आहे, असे मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल म्हणाले.